# प्रकरण पाचवे

# प्रकरण पाचवे

# सारांश आणि निष्कर्ष
# (Summary and Conclusions)

"ग्रामस्वच्छता अभियानातील स्त्रियांचा सहभाग आणि ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव : सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील दोन निवडक गावाचा अभ्यास'' हा प्रस्तुत संशोधनाचा विषय आहे. प्रस्तुत लघुशोध निबंधात एकूण पाच प्रकरणे आहेत. प्रस्तुत पाचव्या प्रकरणात, आधीच्या चार प्रकरणांचा सारांश आणि प्रमुख निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

**प्रकरण पहिले : संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचे स्वरुप**

ग्रामीण भागातील स्वच्छतेची दुरावस्था पाहून ग्रामीण परिसराची, गावाची, घराची स्वच्छता व्हावी, सर्वसामान्य जनतेचे आरोग्यमान व पर्यायाने जीवनमान उंचवावे व त्यायोगे "स्वच्छतेतून समृद्धी'कडे ही संकल्पना मूर्त स्वरुपात यावी म्हणून ज्यांनी स्वत: परिश्रम घेतले त्या "संत गाडगेबाबा' यांच्या नावाने सन २०००-२००१ पासून दरवर्षी ग्रामस्वच्छता अभियान संपूर्ण महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात राबविण्यात येत आहे. पहिल्या प्रकरणात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचे स्वरुप स्पष्ट करण्यात आले आहे.

**प्रकरण दुसरे : साहित्याचे परिशीलन आणि पद्धतीशास्त्र**

प्रस्तुत प्रकरणात दोन भाग केलेले आहेत. पहिल्या भागात समर्पक उपलब्ध संशोधन साहित्याचे परिशीलन करून त्याचा थोडक्यात आढावा घेतला आहे. पाणी पुरवठा आणि स्वच्छतागृहांच्या उपलब्धतेविषयीची भारतातील आणि महाराष्ट्रातील स्थिती आणि संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानासंदर्भातील उपलब्ध आणि प्राप्त लेखनाचे परिशीलन करण्यात आले आहे. दुसऱ्या भागात, अभ्यास पद्धती विषयीचे विवेचन केले आहे.

प्रस्तुत अभ्यासासाठी खालील उद्दिष्ट्ये ठरविण्यात आली होती.

१. सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील,दोन निवडक गावातील, ग्रामस्वच्छता अभियानातील महिलांचा सहभाग अभ्यासणे.

२. ग्रामस्वच्छता अभियानाचा ग्रामीण महिलांवरील प्रभाव अभ्यासणे.

३. ग्रामस्वच्छता अभियानाच्या ग्रामीण पर्यावरणावरील प्रभावाचे परीक्षण करणे.

प्रस्तुत अभ्यासासाठी सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील, जिल्हास्तरीय क्रमांक मिळविलेल्या २०००-२००१ ते २००५-२००६ या सहा वर्षातील पुरस्कारप्राप्त गावांची यादी मिळविण्यात आली. त्यापैकी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील कोरेगाव व कोल्हापूर जिल्ह्यातील करवीर तालुक्यातील शेळकेवाडी हे गाव अशा दोन गावांची सहेतुक नमुना निवड (Purposive Sampling) पद्धतीने निवड केली आहे. या दोन गावासंबंधी अधिकची माहिती मिळविण्यात आली. कोरेगावातील एकूण कुटुंबाची संख्या ८४० आहे व शेळकेवाडीतील एकूण कुटुंबांची संख्या ६५ आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी उपलब्ध असणाऱ्या वेळ, श्रम आणि पैसा या मर्यादांचा विचार करून दोन्ही गावातील २२ टक्के कुटुंबातील महिलांचा नमुन्यात समावेश करण्याचे ठरविले. त्यानुसार "स्तरीत व प्रमाणशीर नमुना' निवड तंत्राच्या साहायाने (Stratified Sample with Proportional Allocation) शेळकेवाडीतील १५ व कोरेगावातील १८५ अशी एकूण २०० कुटुंबे निवडली. या एकूण २०० कुटुंबातील प्रत्येकी एका स्त्री उत्तरदात्याची निवड केली. अशा प्रकारे प्रथम कुटुंबे निवडून नंतर त्यातील स्त्री उत्तरदात्यांची निवड केलेली आहे.

तथ्य संकलनासाठी व्यक्तिगत निरीक्षणे, प्रश्नावली, मुलाखत अनुसूची व छायाचित्रे या तंत्रांचा अवलंब करण्यात आला आहे. व्यक्तिगत निरीक्षणामध्ये स्वच्छतेचा अवलंब गावातील लोकांनी अशा प्रकारे केलेला आहे, त्यात रस्त्यांची स्वच्छता, सांडपाण्याचे नियोजन, शौचालय व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन, परसबागा इ. अनेक घटकाचा समावेश होतो. कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील जिल्हास्तरीय पारितोषिक प्राप्त गावांची सर्वसाधारण माहिती प्राप्त करण्यासाठी प्रश्नावलीचा आधार

घेण्यात आला आहे. त्यात पुरस्कार प्राप्त गावांची एकूण लोकसंख्या, स्त्री-पुरुषांची संख्या स्त्री-पुरुष प्रमाण, कुटुंबातील संख्या, भौगोलिक क्षेत्र, वित्तीय संस्था, शैक्षणिक संस्था, वैयक्तिक शौचालये, सार्वजनिक शौचालये इ. अनेक घटकांचा समावेश केलेला आहे.

प्रस्तुत अभ्यासाच्या उद्दिष्टानुसार मुलाखत अनुसूचीद्वारे कोरेगाव व शेळकेवाडी येथील २०० महिला उत्तरदात्यांची मुलाखत घेण्यात आली. मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने स्वच्छता अभियानातील महिलांचा सहभाग, अभियानाचा महिलांवरील व ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव इत्यादी संबंधीची माहिती संकलित करण्यात आली. ग्रामस्वच्छता अभियानाचा प्रभाव अधिक स्पष्ट व्हावा यासाठी काही छायाचित्रेही घेण्यात आली आहेत.

प्रस्तुत संशोधनासाठी आवश्यक असणारी माहिती संकलित करण्यासाठी तथ्य संकलनाचे काम ऑक्टोबर २००५ ते एप्रिल २००७ या कालावधीमध्ये करण्यात आले.

मुलाखत अनुसूचिद्वारे संकलित केलेल्या माहितीचे सुयोग्य वर्गीकरण आणि विश्लेषण करण्यासाठी संगणकाचा वापर करून त्या माहितीवर केली. त्यानुसार एक संकेत सारणी (Code Sheet) तयार करण्यात आली. त्यानुसार मिळविलेल्या माहितीचे सुयोग्य सांकेतीकरण (Coding) केले. त्यानंतर संगणकीय संख्याशास्त्रीय प्रक्रिया करण्यासाठी MS-Excel आणि SPSS या सॉफ्टवेअरचा वापर करण्यात आला. अशा माहितीचे अहवालात वर्गीकृत स्वरुपात विश्लेषण करण्यात आले आहे.

**प्रकरण तिसरे : कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील अभियानातील यशस्वी गावे आणि निवडक गावातील ग्रामस्वच्छता अभियानाची अंमलबजावणी**

प्रस्तुत प्रकरणात दोन स्थूल विभाग करण्यात आले आहेत. पहिल्या भागात सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातील सन २०००-२००१ ते २००५-२००६ या सहा वर्षाच्या कालावधीत प्रथम, द्वितीय व तृतीय पारितोषिक विजेत्या गावासंबंधी मिळविलेल्या सर्वसाधारण माहितीच्या आधारे काही ठळक निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. दुसऱ्या भागात निवडक गावातील ग्रामस्वच्छता अभियानाची अंमलबजावणी

संबंधीच्या माहितीचे वर्णन केलेले आहे. या दोन्ही गावातील अभियानाची अंमलबजावणी शासकीय मार्गदर्शक सूचनांप्रमाणे झाली आहे.

ग्रामस्वच्छता अभियानात सन २०००-०१ ते २००५-०६ या सहा वर्षाच्या कालावधीत जिल्हास्तरीय पारितोषिक मिळविलेल्या गावाच्या सर्वसाधारण माहितीवरून पुढील ठळक बाबी आढळून आल्या.

१. सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील ३३ पारितोषिक विजेत्या गावातील एकूण लोकसंख्येची सरासरी ३३०४.९० इतकी आहे. सरासरी लोकसंख्येपेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या गावांची संख्या २१ इतकी आहे. याचा अर्थ असा की, पुरस्कार प्राप्त गावांमध्ये कमी लोकसंख्या असणाऱ्या गावाचा समावेश हा मोठ्या प्रमाणात आहे तो ६३.६३ टक्के इतका आहे.

२. २००१ च्या जगगणनेनुसार, महाराष्ट्र राज्यातील स्त्री-पुरुष गुणोत्तर प्रमाण (Sex Ratio) दर १००० पुरुषामागे स्त्रियांची संख्या ९२२ इतकी होती. या पार्श्वभूमीवर पाहिले असता, पारितोषिक प्राप्त ३३ गावातील स्त्री-पुरुष सरासरी गुणोत्तर ९७१ इतके आहे असे दिसून येते. ३३ गावापैकी केवळ एका गावात हे प्रमाण ९२२ पेक्षा कमी आहे. पुरस्कार प्राप्त गावातील दर हजार पुरुषामागील स्त्रियांचे प्रमाण महाराष्ट्राच्या तुलनेत ४९ ने अधिक आहे. याचा अर्थ पारितोषिक प्राप्त गावात स्त्रियांचे प्रमाण चांगले असून स्त्रियांच्या दृष्टीने पोषक वातावरण आहे.

३. सांगली जिल्ह्यातील स्त्री-पुरुष गुणोत्तर १००० : ९७८ इतके आहे. सांगली जिल्ह्यातील १६ गावापैकी ७ गावात स्त्री-पुरुष प्रमाण जिल्ह्याच्या सरासरीपेक्षा अधिक आहे. या सात गावापैकी चार गावात स्त्रियांचे प्रमाण १००० पेक्षा अधिक आहे.

४. कोल्हापूर जिल्ह्यातील स्त्री-पुरुष गुणोत्तर १००० : ९४९ इतके आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील १७ गावापैकी १५ गावात दर हजार पुरुषांमागील स्त्रियांचे प्रमाण जिल्ह्याच्या सरासरीपेक्षा अधिक आहे. केवळ चार गावात स्त्रियांची संख्या १००० हून अधिक आहे.

५. सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील पुरस्कार प्राप्त गावातील कुटुंबाची सरासरी संख्या ५५८.७९ इतकी आहे. पुरस्कार प्रा्प्त ३३ गावापैकी २१ गावातील कुटुंबाची संख्या सरासरीपेक्षा कमी आहे. म्हणजे अभियानात लहान गावे अधिक प्रमाणात यशस्वी होताना दिसतात.

६. पुरस्कार प्राप्त गावातील सरासरी बागायत क्षेत्र ४१०.२४ हेक्टर इतके आहे. ३३ गावापैकी २४ गावात बागायती क्षेत्र सरासरीपेक्षा खूप कमी असल्याचे दिसते. याचा अर्थ ढोबळ मानाने जी गावे सापेक्षत: कमी सधन आहेत अशी गावे सदर अभियानात यशस्वी होताना दिसतात.

७. सर्व गावात शेती हेच गावांचा मुख्य व्यवसाय असून, शेतीतील मुख्य पीक ऊस आहे. ऊसाशिवाय दोन्ही जिल्ह्यात भात, सोयाबीन, भुईमूग, केळी, भाजीपाला अशी इतर पिकेही घेतली जातात.

८. सर्व पुरस्कार प्राप्त गावात पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक शिक्षणाची सोय आहे. कनिष्ठ महाविद्यालयाची सोय ६ गावात आहे तर वरिष्ठ महाविद्यालय केवळ दोनच गावात आहे.

९. पुरस्कार प्रा्प्त गावात वैयक्तिक शौचालयाची सरासरी ४२६ इतकी आहे. १० गावात सरासरीपेक्षा अधिक प्रमाणात शौचालयाची संख्या आहे. या अभियानांतर्गत शौचालयांची उपलब्धता व वापर यावर विशेष भर दिला जात असल्याने १०० टक्के लोकांना शौचालय उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात असल्याचे दिसून येते.

१०. बायोगॅसची सरासरी संख्या ११७.५२ असून १४ गावात सरासरीपेक्षा अधिक बायोगॅसची संख्या आहे. याचा अर्थ पारितोषिक प्राप्त गावांमधून अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर वाढत आहे असे सूचित होते.

**प्रकरण चौथे : संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान : लोकसहभाग आणि प्रभाव**

प्रस्तुत प्रकरणात अभ्यासासाठी निवडलेल्या २०० महिला उत्तरदात्यांकडून मुलाखत अनुसूचीच्या साहायाने संकलित केलेल्या माहितीच्या आधारे, उत्तरदात्या महिलांची सामाजिक पार्श्वभूमी, महिलांचा अभियानातील सहभाग, अभियानाचा महिलावरील आणि ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव याविषयीचे विश्लेषण केले आहे.

सदर प्रकरणात तीन भाग करण्यात आले आहेत. पहिल्या भागात उत्तरदात्यांच्या सामाजिक पार्श्वभूमीविषयीचे विवेचन केले आहे.

दुसऱ्या भागात नमुना कुटुंबातील पुरुषांचा आणि महिलांचा संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातील सहभाग कितपत होता याविषयीचे विवेचन केले आह.

तिसऱ्या भागात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचा महिलांवरील आणि ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव याविषयीचे विवेचन केले आहे.

**अ) उत्तरदात्या महिलांची सामाजिक पार्श्वभूमी :**

शेळकेवाडी व कोरेगावातील महिलांची कौटुंबिक स्थिती दर्शविणारे ठळक मुद्दे खालीलप्रमाणे -

- निवडलेल्या नमुन्यातील बहुसंख्य (६९ किंवा ३४.५ टक्के) उत्तरदाते ३१ ते ४० वर्ष वयोगटातील आहेत.
- शेळकेवाडीतील बहुसंख्य (५ किंवा ३३.३३ टक्के) उत्तरदाते २१ ते ३० वर्ष वयोगटातील आहेत.
- कोरेगावातील बहुसंख्य (६५ किंवा ९४.२० टक्के) उत्तरदाते ३१ ते ४० वर्ष वयोगटातील आहेत.
- नमुन्यातील बहुसंख्य (१९८ किंवा ९९ टक्के) उत्तरदात्या महिला विवाहित आहेत.
- शेळकेवाडीतील सर्वच (१०० टक्के) उत्तरदात्या महिला विवाहित आहेत.

- कोरेगावातील दोन वगळता अन्य सर्व उत्तरदात्या महिला विवाहित आहेत.
- नमुन्यातील बहुसंख्य (१८२ किंवा ९१ टक्के) उत्तरदात्या महिला हिंदू आहेत.
- शेळकेवाडीतील सर्वच (१०० टक्के) महिला हिंदू आहेत.
- कोरेगावातील बहुसंख्य (१६७ किंवा ९०.२७ टक्के) महिला हिंदू आहेत.
- नमुन्यातील बहुसंख्य (१३३ किंवा ६६.५ टक्के) महिला खुल्या प्रवर्गातील आहेत. सर्वात कमी महिला अनुसूचित जमाती (१ किंवा ०.५ टक्के) या प्रवर्गातील आहेत.
- शेळकेवाडीतील सर्वच महिला (१०० टक्के) खुल्या प्रवर्गातील आहेत.
- कोरेगावातील सर्वाधिक महिला उत्तरदात्या खुल्या प्रवर्गातील आहेत. तर सर्वात कमी उत्तरदात्या अनुसूचित जमाती या प्रवर्गातील आहेत.
- नमुन्यातील बहुसंख्य महिला (७७ किंवा ३८.५ टक्के) माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षण झालेल्या आहेत. तसेच उत्तरदात्यांमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण सापेक्षतः कमी असल्याचे दिसून येते.
- शेळकेवाडीतील बहुसंख्य (६ किंवा ४० टक्के) महिला उत्तरदात्या माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्या आहेत.
- कोरेगावातील बहुसंख्य (७१ किंवा ९२.२१ टक्के) महिला उत्तरदात्या माध्यमिक शिक्षण पूर्ण केलेल्या आहेत.
- समग्र नमुन्यामध्ये बहुसंख्य (१२२ किंवा ६१ टक्के) महिला संयुक्त कुटुंबातील आहेत. तर उर्वरित विभक्त कुटुंबातील आहेत.
- शेळकेवाडीतील एकूण उत्तरदात्यांपैकी ५३.३३ टक्के संयुक्त कुटुंबातील महिला आहेत.

- कोरेगावातील बहुसंख्य (१४४ किंवा ६१.२२ टक्के) उत्तरदात्या महिला संयुक्त कुटुंबातील आहेत.
- निवडक गावातील समग्र नमुन्यामध्ये कुटुंबाच्या आकारानुसार केलेल्या वर्गीकरणात असे दिसून आले की, बहुसंख्य (१०० किंवा ५० टक्के) उत्तरदाते लहान आकाराच्या कुटुंबातील (५ पर्यंत सदस्य) आहेत.
- शेळकेवाडीतील बहुसंख्य (१० किंवा ६६.६७ टक्के) उत्तरदाते लहान कुटुंबातील आहेत. एकही उत्तरदाती (११ ते २१) मोठ्या कुटुंबातील नाही.
- कोरेगावातील बहुसंख्य (९० किंवा ४८.६५ टक्के) उत्तरदाते लहान कुटुंबातील आहेत.
- व्यवसायाचा विचार करता एकूण उत्तरदात्यांपैकी बहुसंख्य (१२५ किंवा २१ टक्के) महिला उत्तरदात्या गृहिणी व स्वतःची शेती या कामात गुंतलेल्या आहेत.
- शेळकेवाडीतील बहुसंख्य (११ किंवा ७३ टक्के) महिला गृहिणी व स्वतःची शेती करणा-या आहेत.
- कोरेगावातील बहुसंख्य (११४ किंवा ६१.६२ टक्के) महिला गृहिणी व स्वतःची शेती करणारे आहेत.

**ब) संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातील पुरुष आणि महिलांचा सहभाग :**

- शेळकेवाडी व कोरेगाव या दोन गावातील नमुना कुटुंबातील स्त्री, पुरुष, एकूण सदस्य यांचा अभियानातील सहभाग कितपत होता या विषयीचे निष्कर्ष खालीलप्रमाणे -
- शेळकेवाडीतील निवडलेल्या १५ नमुना कुटुंबामध्ये ३९ पुरुष, ३८ स्त्रिया असे एकूण ७७ सदस्य होते.

- शेळकेवाडीत अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या १६ विविध कार्यक्रमातील नमुना कुटुंबातील पुरुषांचा सरासरी सहभाग ५९.६१ टक्के इतका होता.
- शेळकेवाडीत अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या १६ विविध कार्यक्रमातील नमुना कुटुंबातील स्त्रियांचा सरासरी सहभाग ६२.८४ टक्के इतका होता.
- यावरून शेळकेवाडीत राबविण्यात आलेल्या ग्रामस्वच्छता अभियानामध्ये स्त्रियांचा यशस्वी सहभाग पुरुषांपेक्षा ३.२३ इतका अधिक होता असे दिसून आले.
- शेळकेवाडीतील ग्रामस्वच्छता अभियानात निवडलेल्या नमुन्यातील कुटुंबातील स्त्री-पुरुषांचा एकूण सरासरी सहभाग ६१.२० टक्के इतका हाता. यावरून ग्रामस्वच्छता अभियानात शेळकेवाडीतील ग्रामसंस्थांचा सहभाग लक्षणीय होता असे म्हणता येईल.
- कोरेगावातील निवडलेल्या १८५ नमुना कुटुंबामध्ये ५९३ पुरुष, ६१९ स्त्रिया असे एकूण १२१२ सदस्य होते.
- कोरेगावात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या १६ विविध कार्यक्रमातील नमुना कुटुंबातील पुरुषांचा सरासरी सहभाग ५६.७९ टक्के इतका होता.
- कोरगावात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या १६ विविध कार्यक्रमातील नमुना कुटुंबातील स्त्रियांचा सरासरी सहभाग ५०.५४ टक्के इतका होता.
- यावरून ग्रामस्वच्छता अभियानामध्ये स्त्रियांचा सरासरी सहभाग पुरुषांपेक्षा ६.२५ इतका कमी होता असे दिसून आले.
- कोरेगावात निवडलेल्या नमुन्यातील स्त्री-पुरुषांचा ग्रामस्वच्छता अभियानातील एकूण सरासरी सहभाग ५३.६१ टक्के इतका होता.
- शेळकेवाडी व कोरेगाव या दोन्ही गावातील, निवडलेल्या २०० नमुना कुटुंबामध्ये ६३२ पुरुष व ६५७ स्त्रिया असे एकूण १२८९ सदस्य होते.

- शेळकेवाडी व कोरेगाव या दोन्ही गावातील, २०० नमुना कुटुंबातील ग्रामस्वच्छता अभियानातील पुरुषांचा सरासरी सहभाग ५८.१९ टक्के इतका होता.
- शेळकेवाडी व कोरेगाव या दोन्ही गावातील २०० नमुना कुटुंबातील ग्रामस्वच्छता अभियानातील स्त्रियांचा सरासरी सहभाग ५६.६९ टक्के इतका होता.
- शेळकेवाडी व कोरेगावातील निवडलेल्या नमुना कुटुंबातील स्त्री-पुरुषांचा एकूण सरासरी सहभाग ५७.२६ टक्के इतका होता.
- शेळकेवाडी व कोरेगावात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत राबविलेल्या १६ विविध कार्यक्रमात स्त्रियाचा सरासरी सहभाग पुरुषापेक्षा सापेक्षत: कमी होता असे दिसून आले.

**संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचा महिलांवरील आणि ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव :**

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचा महिलांवरील प्रभाव स्पष्ट करणारे ठळक मुद्दे खालीलप्रमाणे -

**१) घर व परीसर स्वच्छता विषयक वाढती जाणीव आणि कृतिशीलता :**

शेळकेवाडीतील निवडलेल्या १५ नमुना कुटुंबापैकी बहुसंख्य ७३.३३ टक्के महिला उत्तरदात्या व कोरेगावातील निवडलेल्या १८५ नमुना कुटुंबातील बहुसंख्य ९९.४६ टक्के महिला उत्तरदात्या नियमितपणे घर व परिसर स्वच्छ ठेवतात. अंगणात सडा टाकून रांगोळी काढतात. यावरून असे दिसून येते की, स्वच्छता अभियानामुळे महिलांची घर व परिसर स्वच्छ ठेवण्याची सवय अधिक बळकट झाली आहे. आता घराच्या आजुबाजूच्या परिसरात देखील पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात स्वच्छता दिसून येते. महिलांची स्वच्छताविषयक जाणीव अधिक वाढली आहे आणि त्या अधिक कृतिशील बनल्या आहेत.

**२) शौचालय बांधल्यामुळे महिलांची कुचंबणा थांबली आहे :**

शेळकेवाडीत १०० टक्के कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालये आहेत. कोरेगावात ९५ टक्के कुटुंबाकडे वैयक्तिक शौचालये आहेत. अभियान राबविण्यापूर्वी शौचविधीसाठी महिलांना हागणदारीत, शेतामध्ये इ. ठिकाणी जावे लागत असे. ही गोष्ट त्रासदायक, लाजिरवाणी, अडचणीची वाटायची. स्वच्छता अभियानामुळे शौचालये बांधल्यामुळे महिलांची कुचंबणा थांबली आहे.

**३) महिलांना होणारा धुराचा त्रास गोबरगॅसमुळे थांबला :**

दोन्ही गावात गोबर गॅस प्लॅट उभारण्यात आले आहेत. त्यामुळे बऱ्याच महिलांचा इंधनासाठी दूरवर जावून लाकूड किंवा जळण गाळा करण्याचा त्रास कमी झालेला आहे. तसेच कोरेगावात सिलेंडर गॅसचाही मोठ्या प्रमाणात वापर होतो. या सर्व गोष्टीमुळे महिलांना धुराचा होणारा त्रास व इतर बराच त्रास थांबलेला दिसून येतो.

**४) परसबागाचा महिलांना झालेला फायदा :**

शेळकेवाडीत नमुना कुटुंबात सर्वाधिक (८७ टक्के) महिलांच्या घरी परसबागा आहेत. तर कोरेगावात ६६ टक्के महिलांच्या घरी परसबागा आहेत. घर परिसर सुंदर दिसण्याबरोबर परसबागेमध्ये फुलांची, फळांची झाडे, औषधी वनस्पती व भाजीपाला इ. चा समावेश आहे. त्याचा फायदा महिला वर्गाना मोठ्या प्रमाणात झालेला आहे.

**५) कचरा व्यवस्थापनाची जाणीव महिलांमध्ये वाढली आहे :**

शेळकेवाडीत अभियानापूर्वी फक्त चारच उत्तरदात्यांकडे कचराकुंड्या होत्या. सध्या सर्वच (१०० टक्के) उत्तरदात्यांच्या घरात कचराकुंड्या आहेत.

कोरेगावात अभियानापूर्वी ६७ टक्के उत्तरदात्यांच्या घरात कचराकुंड्या होत्या, सध्या ९० टक्के कचराकुंड्या आहेत. पूर्वी दोन्ही गावातील अनेक लोक घरातील कचरा आजूबाजूला टाकीत होते. अभियानानंतर शेळकेवाडीतील सर्वच उत्तरदाते घरातील कचऱ्याचा उपयोग आता कंपोस्ट खतासाठी करतात. कोरेगावातील १७६ उत्तरदाते घरातील कचऱ्याचा उपयोग कंपोस्ट खतासाठी करतात. उर्वरित ९ उत्तरदाते घरातील कचऱ्याची विल्हेवाट नेडॅपसाठी करतात. या सर्व गोष्टीमुळे गावात, परिसरात सर्वत्र

स्वच्छता दिसून येते, तसेच कचरा व्यवस्थापनाची जाणीव महिलांमध्ये वाढल्याचे दिसून येते.

**६) बालकांच्या आणि मातांच्या आरोग्याबाबतची महिलांची जाणीव वाढली आहे :**

ग्रामस्वच्छता अभियानामुळे निवडक गावात, गरोदर मातांची तपासणी व बाळाला स्तनपान करण्याचे महत्त्व व बालसंगोपनाविषयी तसेच आहाराविषयी माहिती देण्यात आली. सदृढ बालक स्पर्धा घेतल्या आणि सर्व रोगनिदान आरोग्य शिबिर घेतले. याचा फार मोठा फायदा महिलांना झाला. तसेच मुलांना शाळेतही चांगल्या सवयी लागलेल्या दिसून येतात. त्याप्रमाणे ते वागतात. त्यामुळे आरोग्य चांगले सदृढ राहण्यास मदत होते. स्वच्छतेच्या सवयी कायम रुजतात. या सर्व गोष्टीमुळे महिलांचया आरोग्यविषयक ज्ञानात व जाणिवेत वाढ झाल्याचे दिसून येते.

**७) स्त्रियांच्या आरोग्यात सुधारणा :**

अभियान राबविण्यापूर्वी दोन्ही गावातील अनेक महिला दूषित पाणी व अस्वच्छतेमुळे वारंवार आजारी पडत होत्या. मात्र अभियान राबविल्यामुळे दूषित पाणी व अस्वच्छतेमुळे उद्‌भवणारे आजार कमी झाले आहेत. त्यामुळे स्त्रियांच्या आरोग्यात सुधारणा झाली आहे.

**८) महिला मंडळे व बचत गटांचा फायदा :**

अभियान राबविण्यापूर्वी निवडक गावात महिलामंडळे व बचतगट होते. पण ते केवळ नावालाच होते. त्यांचे मार्फत कोणतेही भरीव काम होत नव्हते. मात्र अभियानानंतर बचतगटाची संख्या वाढलेली दिसून येते. शेळकेवाडीत एकूण ६, कोरेगावात एकूण ४६ बचतगट कार्यरत असल्याचे दिसून येते. बचतगटांमुळे स्त्रियांना आर्थिक लाभ व रोजगाराच्या संधी मिळाल्या आहेत. तसेच बचतगटांमार्फत महिला दर महिन्याला काही रक्कम जमा करतात व ती रक्कम बँकेत ठेवतात आणि ज्यांच्या काही अडचणी असतील त्याना रक्कम कर्जरुपाने देतात व रक्कम परत घेताना त्या रकमेवर नियमाप्रमाणे व्याज घेतात. यातून मिळणारा फायदा सर्व महिलांना मिळतो व महिलांच्या अडचणी दूर होण्यास मदत होते. बचतगटांचा फायदा महिलाना झाला असल्याचे दिसून आले.

**९) अभियानामुळे सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची संधी महिलांना मिळाली आहे :**

परंपरेप्रमाणे चूल व मूल एवढेच महिलांचे कार्यक्षेत्र मर्यादित न राहता, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानामुळे चार भिंतीच्या बाहेर पडून गावातील सार्वजनिक जीवनात सहभागी होण्याची संधी महिलांना मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाली आहे. त्यामुळे राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढण्यास चालना मिळाली आहे.

**संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचा ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव :**

शेळकेवाडी व कोरेगाव या दोन गावांमध्ये राबविण्यात आलेल्या ग्रामस्वच्छता अभियानामुळे ग्रामीण पर्यावरणावर कोणता प्रभाव पडला याविषयीचे ठळक निष्कर्ष खालीलप्रमाणे -

**अ) ग्रामीण परिसराची स्वच्छता :**

**१) रस्ते साफसफाई :**

शेळकेवाडी गावातील रस्ते अभियानापूर्वी कच्चे होते. अभियानानंतर गावातील सर्व लोक एकत्र येऊन त्यांनी लोकवर्गणी व लोकसहभागातून गावातील रस्ते चांगले व स्वच्छ केले.

कोरेगावात अभियानापूर्वी लोक रस्त्यांच्याया कडेला घरातील सर्व केरकचरा टाकीत होते. त्यामुळे सर्व लोकांना त्याचा त्रास होत असे. अभियान काळात गावातील रस्त्यांचे डांबरीकरण केले व रस्त्याच्या कडेला असणारी घाण काढली. त्यामुळे रस्ते स्वच्छ व चांगले बनले. त्याचा फायदा तेथील लोकांना झाल्याचे दिसून आले.

**२) गटारे बांधकाम व सांडपाणी निर्मुलन :**

शेळकेवाडीत एकूण ७८० मी. लांबीची गटारे बांधण्यात आली आहेत. गावात कुठेही दलदल व सांडपाणी साचून राहील असा एकही खड्डा नाही. सांडपाण्यावर परसबागा फुलविल्या आहेत. त्यामुळे गावात सर्वत्र स्वच्छता ठेवली जात असल्याचे व परसबागा तयार केलेल्या दिसून येतात.

कोरेगावात सांडपाण्याच्या नियोजनामुळे पर्यावरणाच्या अनेक समस्या कमी झाल्या. सांडपाण्यावर ४३९ कुटुंबानी परसबागा तयार केल्या आहेत. गावात ६००० मी. लांबीची गटोर बांधली असून ५०० मीटर लांबीची गटारे बंदिस्त स्वरुपात आहेत. या सर्वांचा परिणाम, घराघरातील आरोग्य चांगले रहाण्यास मदत झाली आहे.

### ३) कचरा निर्मुलन :

अभियान राबविण्यापूर्वी दोन्ही गावात सर्वत्र कचऱ्याचे साम्राज्य होते. अभियान काळात लोकसहभागाद्वारे सर्व कचरा नष्ट करण्यात आला. शेळकेवाडी गावात १० सार्वजनिक कचराकुंड्या ठेवलेल्या आहेत. तसेच कचरा विल्हेवाटीसाठी ६५ वैयक्तिक कंपोस्ट खड्डे आहेत. कचऱ्याच्या माध्यमातून गांडूळ खत निर्मिती प्रकल्प सुरु आहे. थोडक्यात या सर्व उपक्रमांमुळे सर्वत्र स्वच्छता राहण्यास मदत झाली आहे.

कोरेगावात ९० टक्के घरात कचराकुंडी वापरतात. तसेच प्लॅस्टिक वापरावर बंदी आहे. सार्वजनिक ठिकाणी ६७ कचराकुंड्या व ७ ठिकाणी नेडॅप व ४ ठिकाणी सार्वजनिक गांडूळ खत प्रकल्प उभारण्यात आले आहेत. यामुळे स्वच्छता राहण्यास मदत झाली आहे.

### ४) घर, परिसर, शाळा व सार्वजनिक इमारतीची स्वच्छता :

शेळकेवाडी गावात अभियानकाळात घरे, शाळा, ग्रामपंचायत कार्यालये, देवालये, सार्वजनिक इमारती इ. गुलाबी रंगाने रंगविलेल्या आहेत. तसेच त्यांची स्वच्छता ही ठेवली जाते. ह्यामुळे गाव परिसर स्वच्छ व सुंदर दिसून येतो.

कोरेगावात घरांची, रस्त्यांची, घरासमोरील अंगणे, शाळा, सार्वजनिक इमातरी यांची स्वच्छता नियमित ठेवली जाते. तसेच शाळेसाठी बागेची निर्मिती, तसेच देवालयाच्या आजुबाजूच्या जागेत बागेची निर्मिती केलेली आहे.

**ब) पाणी व्यवस्थापन :**

**१) शुद्ध पिण्याचे पाणी व आरोग्य :**

शेळकेवाडी या गावात पिण्याच्या पाण्याच्या टाकीमध्ये टी.सी.एल्. पावडर योग्य प्रमाणात वेळेवर नियमित टाकली जाते. अभियान सुरु झाल्यापासून गावात कोणत्याही जलजन्य अथवा अन्य साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव झालेला नाही. तसेच पिण्याचे पाणी उंचावर ठेवले जाते व ते घेण्यासाठी वगराळ्याचा वापर केला जातो. त्यामुळे हाताची घाण पाण्यात पडून पाणी दूषित होत नाही.

कोरगावातही पाणी शुद्धीकरणासाठी १००० लिटर पाण्यामध्ये योग्य प्रमाणात टी. सी. एल्, पावडर टाकून पाणी शुद्धीकरण केले जाते. तसेच पिण्याचे पाणी उंचावर ठेवले जाते व वगराळ्याचा वापर करतात. याशिवाय पाण्याचा वापर काटकसरीने केला जातो.

**क) पर्यावरण संवर्धन :**

**१) वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन :**

शेळकेवाडी गावात प्रत्येक कुटुंबाने ५० झाडे याप्रमाणे सर्व कुटुंबानी झाडे लावलेली आहेत. तसेच ती जतन केलेली आहेत.

कोरेगावात प्रति कुटुंब ३२ झाडे याप्रमाणे झाडे लावलेली आहत व ती जतन केलेली आहेत. त्यात आवळा, गुंज, अंजिर, रातराणी, एक्झोरा, गोल्डन ड्युरांडा, सिमारोह, पुत्रवती, आंबा, नारळ, शेवगा, चिक्कू, पपई इ. झाडाचा समावेश आहे.

**२) कुऱ्हाडबंदी :**

दोन्ही गावात वृक्षतोडबंदी किंवा "कुऱ्हाडबंदी' करण्याचा निर्णय घेतलेला आहे. इंधनासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड होते व पर्यावरणात असंतुलन निर्माण होते. झाडे न तोडण्याचा निर्णय गावकऱ्यानी घेतला आहे.

### ३) प्लॅस्टिक बंदी :

पर्यावरणाचा सर्वात मोठा शत्रू म्हणून आज प्लॅस्टिककडे पाहिले जाते. त्याच्या अविनाशी तत्वामुळे ते नष्टही करता येत नाही. प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर टाळणे हे पर्यावरण संरक्षणासाठी आवश्यक आहे. हे ओळखून कोरेगाव व शेळकेवाडी या दोन्ही गावात प्लॅस्टिक पिशव्यांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे.

### ४) शौचालयाची उपलब्धता व वापर :

सर्वसाधारणपणे ८० टक्के आजार उघड्यावर शौचविधीमुळे होतात. अनेक रोगराईना सहज आमंत्रण मिळते. त्यामुळे ग्रामस्वच्छता अभियानात शौचालय बांधण्यावर व वापरावर अधिक भर देण्यात आल्याने ग्रामीण पर्यावरणावर अनुकूल प्रभाव झाल्याचे दिसून येते. कोरेगाव व शेळकेवाडी ही दोन्ही गावे १०० टक्के हागणदारी मुक्त बनली आहेत.

### ५) बायोगॅस / गोबरगॅस :

पर्यावरण संवर्धनासाठी अपांरपरिक ऊर्जा स्त्रोतांचा वापर अधिकाधिक होणे आवश्यक आहे. शेळकेवाडीत बायोगॅसची संख्या ६८ आहे. त्याला शौचालये जोडली आहेत. कोरेगावात ४५२ गोबरगॅस आहेत व त्यास शौचालये जोडण्यात आली आहेत. गोबरगॅसचा उपयोग स्वयंपाकासाठी इंधन व सोनखतासाठी होतो.

### ६) निर्धुर चुली :

हवा प्रदुषण रोखण्यामधील हा एक महत्त्वाचा घटक आहे. धुरामुळे विशेषतः महिलांच्या आरोग्यावर अनेक घातक परिणाम होतात. तसेच पर्यावरण दूषित होते. दोन्ही गावात बायोगॅस, सिलेंडर गॅस वापरतात. ज्यांच्याकडे सिलेंडर गॅस, बायोगॅस नाही असे लोक निर्धुर चुलींचा वापर करतात.

### ७) सौरऊर्जा :

दोन्ही गावात सौरऊर्जा वापरही केला जातो. शेळकेवाडी गावात ५, कोरेगावात २० सौरदिवे बसविलेले आहेत. ७ कुटुंबाकडे सौर प्रकाशाची सोय आहे. १० कुटुबाकडे सोलर वॉटर हिटर बसविलेले आहेत.

अशा प्रकारे पर्यावरणाचे होणारे नुकसान अभियान राबविल्यामुळे टाळता येणे शक्य होत आहे. सदर अभियान महाराष्ट्रातील सर्व गावानी राबविल्यास ग्रामीण पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन होण्यास मदत होईल.